# पॉलि–तरंग–2018 चे शाहू पॉलिटेक्नीकमध्ये बक्षिस वितरण संपन्न

औरंगाबाद :– कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ पॉलिटेक्नीकमध्ये पॉलि–तरंग–2018 वार्षीक स्नेह संमेलना निमित्त घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे बक्षिस वितरण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.श्रीकांत देशमुख, दंत महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.एस. सी.भोयर, कृषी महाविद्यालयाचे संचालक तथा प्राचार्य डॉ.डी.के. शेळके व कॉलेज ऑफ पॉलिटेक्नीकचे प्राचार्य श्री.जी.बी.डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले.

पॉलि–तरंग–2018 च्या निमित्ताने विविध खेळांच्या स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या होत्या. या मध्ये क्रिकेट, बॅडमिंटन, हॉलिबॉल, कब्बडी, चेस, कॅरम तसेच सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये अंताक्षरी, रांगोळी, डिपार्टमेंट अॅट अ ग्लान्स, सिंगींग, डान्स इत्यादीचे मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. याच कार्यक्रमामध्ये अकॅडमीक टॉपर्सच्या सर्व विभागातील विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. 100% पैकी 100% मार्क मिळवणारे विद्यार्थी आणि विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला. विविध विभागातील शिक्षकांचा 100% विषयाचा निकाल लावण्याबाबत मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यत आला.

या कार्यक्रमामध्ये विद्यार्थी संसद सचिव अक्षय सुर्यवंशी याने अहवाल सादर केला तसेच प्राचार्य गणेश डोंगरे यांनी प्रास्ताविकपर बोलतांना विद्यार्थ्यांच्या यशाचे गमक म्हणजे चिकाटी, जिद्द व प्रचंड मेहनत असल्याचे नमुद केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांनी विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबाबत अभिनंदन केले व जीवनामध्ये शिस्तप्रिय असणे आवश्यक आहे. तसेच कोणतेही काम करतांना वैज्ञानिक दृष्टीकोन समोर ठेऊन प्रत्येक बाबींचा सखोल अभ्यास मेहनत व सातत्य असणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ

पॉलिटेक्नीकचा यशाचा वाढता आलेख पाहून त्यांनी कौतुक करुन समाधान व्यक्त केले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.रणजीत मुळे, सचिव श्री.पद्‌माकर मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ.श्रीकांत देशमुख, संस्थेचे, एच. आर. ऑफिसर श्री.अशोक आहेर, प्राचार्य श्री.गणेश डोंगर व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. प्रांजल चौधरी हीने केले तर आभार प्रदर्शन प्रा. कैलास तिडके यांनी केले.



**पॉलि-तरंग २०१८ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित देखावा सादर करताना शाहू तंत्रनिकेतनचे विद्यार्थी.**




**पॉलि-तरंग २०१८ मध्ये मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.**